दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ४१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१२ मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कोंकण विभागातील ११ सरपंच, १ उपसरपंचावर कारवाई

## विभागीय आयुक्त विलास पाटील यांचे आदेश

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

**कोकण विभागातील एकूण ११ सरपंच, १ उपसरपंचावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ३९ नुसार अधिकार व सदस्य पदावरून काढून टाकण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी केली आहे. कोंकण विभागांतर्गत ग्रामपंचायतींवर झालेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी कार्यवाही आहे.**

कोकण विभागांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, उपसरपंच, सदस्यांमार्फत होणारे गैरवर्तन, गैरव्यवहारांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेने सादर केलेल्या अहवाला-नुसार ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर व सिंधुदूर्ग या जिल्हयांमधील एकूण ३५ सरपंच,उपसरपंच व सदस्यांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील तरतूदीनूसार आयुक्त श्री. विलास पाटील यांनी दि. १५ फेब्रूवारी २०२२ रोजी सुनावण्या घेतल्या. यापैकी १६ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला. निर्णय घेतलेल्या प्रकरणांमध्ये ठाणे जिल्हयाच्या मुरबाड तालुक्यातील न्हावे, पालघर जिल्हयाच्या वाडा-खुपरी, रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यातील नादगाव, रोहा-कडसूरे, महाड-आंबिवली, पेण-रावे, रत्नागिरी जिल्हयाच्या संगमेश्वर- साखरपा, राजापूर-आजिवली, सिंधुदूर्ग जिल्हयातील सावंतवाडी-शेर्ले, देवगड-कोटकामते, नारीग्रे या ११ ग्रामपंचायतीचे सरपंच व पालघर जिल्ह्याच्या वसई तालुक्यातील मालजीपाडा येथील उपसरपंच यांना त्यांचे अधिकार पदावरुन व सदस्य पदावरून काढून टाकण्याचा निर्णय दिला आहे. त्याचबरोबर काही प्रकरणांमध्ये सरपंच यांच्यावर १८ सप्टेंबर २०१९ च्या शासन शुध्दीपत्रकानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे तसेच दोषी असेलेल्या सबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशीचे आदेशही यावेळी विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.

सदर १६ निर्णयामधील महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ३९ नुसार २ प्रकरणे खारीज करण्यात आली आहेत. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ४० नुसार पालघर जिल्ह्यातील वसई- कळंब व रायगड जिल्ह्यातील सुधागड - अडुळसे या ग्रामपंचायतीच्या २ सदस्यांना अपात्र ठरविण्यात आले आहेत. ग्रामपंचायतींमध्ये अशा प्रकारचा गैरव्यवहार होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. संबधित गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी ग्रामपंचायतीना भेटी देतात किंवा नाही याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरून अशा प्रकारच्या अनियमिततेची प्रकरणे भविष्यात घडणार नाही. अशा सुचनाही विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी यावेळी दिल्या आहेत.

# जलप्रदूषण प्रकरणी तेलवाहू जहाज डीजी शिपिंग विभागाच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । उरण**



रासायनिक द्रव्यांची वाहतूक करताना कोणतीही दक्षता न घेता सागरी प्रदुषणास कारणीभूत ठरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जेएनपीए बंदरात दाखल झालेल्या ग्लोबल जेनेसिस हे तेलवाहू जहाज डीजी शिपिंग विभागाने चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

घातक रसायनाने भरलेले अग्रवाल शिप ग्रुपचे ग्लोबल जेनेसिस हे तेलवाहू जहाज जेएनपीए बंदरात दाखल झाले होते. चार दिवसांपूर्वी बंदरात दाखल झालेल्या रसायन भरलेल्या तेलवाहू जहाजातओलावा मिक्सिंगने भरलेले उत्पादन दोषपूर्ण असल्याचे दिसून आले. घातक रसायनाच्या गळतीची कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली नव्हती.

यामुळे समुद्रात रसायन मिसळून जलप्रदू-षणास कारणीभूत ठरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर डीजी शिपिंग विभागाने ताब्यात घेऊन चौकशी सुरूवात केली आहे. या दरम्यान या तेलवाहू जहाजातील तेल गळतीचा संभाव्य धोका लक्षात घेऊन हे जहाज जेएनपीए बंदरातुन दूरवर हलविण्यात आले असून न्हावा येथील ओएनजीसीच्या जेट्टी समोरील कंरपाइंटवर नांगरुन ठेवण्यात आले आहे.

चौकशीपुर्ण होईपर्यंत आणि एनओसी अहवाल प्राप्त होईपर्यंत जहाजाला सोडण्यात येणार नसल्याची माहिती जेएनपीटीच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे. जेएनपीए बंदरात दाखल झालेल्या ग्लोबल जेनेसिस या तेलवाहू जहाजाची 'पोर्ट स्टेट इन्स्पेक्शन' नियमानुसार संपुर्ण तपासणी करून चौकशी केली जाणार असल्याची माहिती डीजी शिपिंग विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# गावठी बनावटीचे चार पिस्तल व चार जिवंत काडतुसे जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाच्या बाहेर असलेल्या सर्कलजवळ एक इसम गावठी बनावटीचे ४ पिस्टल व चार जिवंत काडतुसे घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष २ ला मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून गोपाल राजपाल भारद्वाज (वय २२, रा. नवोदय नगर, टेहरी, उत्तराखंड) याला अटक करण्यात आली आहे.

पनवेल रेल्वे स्थानक परिसरात एक इसम अनधिकृतपणे गावठी बनावटीचे अग्निशस्त्र विक्री करण्यासाठी घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष २ चे प्रवीण फडतरे यांना मिळाली. याची माहिती त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांना दिली. त्यानुसार पनवेल एसटी स्टँड परिसरात सापळा रचण्यात आला. याच दरम्यान एक इसम पाठीवर काळ्या रंगाची बॅग घेऊन रेल्वे स्टेशन कडून सर्कल कडे पायी चालत येत असताना दिसला. यावेळी तो इसम रीक्षेला हात करत होता. पोलिसांनी या इसमाला ताब्यात घेतले. त्याचे नाव गोपाल राज्यपाल भारद्वाज असे आहे. त्याच्या बॅगची पाहणी केली असता त्यात चार गावठी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुसे मिळून आली. व खिशात मोबाईल सापडला. हे पिस्टल त्याने कुठे, कोणाला विक्री करणार होता याची अधिक माहिती पोलीस घेत आहेत.

# एमजीएम रुग्णालयात चार वर्षीय मुलाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे एमजीएम रुग्णालयात एका चार वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. हॉस्पिटल मधील टेक्निशियनने या मुलाला इंजेक्शन दिल्यानेच मुलाचा मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणी मृत मुलाचा शव विच्छेदन अहवाल आणि डॉक्टरांच्या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल असे पोलिसांनी सांगितले आहे.

आदई येथील चार वर्षीय अर्जुन नेपाळी याच्या पाठीवर गाठ आली होती. यासाठी त्याला एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी आणले होते. एमजीएम रुग्णालयातील टेक्निशियन ने दिलेल्या चुकीचे इंजेक्शन मुळेच त्या मुलाचा जागीच मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीय आणि मनसे कार्यकर्त्या कडून केला जात आहे. या चार वर्षीय मुलाच्या मृत्यूनंतर टेक्निशन फरार असल्याचे समोर आले आहे. याबाबत मयत मुलाच्या कुटुंबीयांनी मनसेचे पनवेल शहराध्यक्ष योगेश चिले यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन प्रशासनाला जाब विचारला व पोलिस स्टेशन गाठले. यावेळी प्रशासन आणि चुकीचे इंजेक्शन देणाऱ्या वर कडक कारवाई करण्याची मागणी योगेश चिले, पराग बालड यांनी केली आहे. याबाबत एमजीएम रुग्णालयाच्या प्रशासनाशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

# रेल्वे प्रशासनाचा कर्जतकरांवर अन्याय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जतकर रेल्वे प्रवाशांच्या मागणीला केराची टोपली दाखवली असल्याने, कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन रेल्वे प्रशासनाचा जाहीर निषेध केला आहे.

कर्जत रेल्वे स्थानकातुन रेल्वे प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक मेल एक्सप्रेस गाड्यांचा कर्जत रेल्वे स्थानकातील अधिकृत थांबा रद्द केला आहे. कर्जत तसेच नेरळ, भिवपुरी, वांगणी, शेलु, बदलापूर, पेण, पनवेल, कर्जत खालापूर तालुक्यासह मुरबाड तालुक्यातील असंख्य रेल्वे प्रवाशांना बाहेरगावी जाण्यासाठी मेल एक्स्प्रेस गाड्या पकडण्यासाठी अतोनात हाल सोसावे लागत आहेत. या गंभीर गोष्टीकडे मध्य रेल्वे प्रशासन लक्ष केंद्रित करणार आहे की नाही..?? कर्जत रेल्वे स्थानकात पुर्वी प्रमाणे मेल एक्स्प्रेस गाड्या केव्हापासुन थांबणार..?

रेल्वे प्रशासनास कमी उत्पन्न मिळवुन देणाऱ्या गुजरातसह इतर सर्व राज्यातील सर्व गाड्या पुर्ववत सुरू झाल्यात परंतु, महाराष्ट्र राज्यातुन सर्वाधिक उत्पन्न मिळवुन देणा-या महाराष्ट्र राज्यावर मात्र भयंकर अन्याय होत आहे.. सुस्त झोपलेले रेल्वे प्रशासनाचा जाहीर निषेध... महाराष्ट्रातील सर्व सन्माननीय आमदार, सन्माननीय खासदार, सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी ह्यांनी देखील सदर बाबीकडे जातीने लक्ष देऊन महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांवर होणारा अन्याय लवकरात लवकर दुर करावा अशी मागणी कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशन सचिव प्रभाकर गंगावणे यांनी केली आहे.

## संक्षिप्त...

### भाजपाच्या २८ नेत्यांची प्रकरणं उघड करणार : संजय राऊत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेचे खासदार संजय राऊत आणि भाजपा नेते किरीट सोमय्या यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांच्या वादात आता संजय राऊत यांनी नवा बॉम्ब टाकला आहे. संजय राऊत गेल्या तीन दिवसांपासून किरीट सोमय्या यांच्याशी निगडीत युवक प्रतिष्ठानवर खळबळजनक आरोप करत आहेत. यासंदर्भातील ट्विट्सची मालिकाच त्यांनी सुरू केली आहे. याचाच पुढचा भाग म्हणून आज संजय राऊत यांनी युवक प्रतिष्ठानला मोतीलाल ओसवाल कंपनीकडून लाखो रुपयांचा निधी मिळाला असल्याचा आरोप केला. यावेळी राऊतांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना भाजपा नेते किरीट सोमय्या यांच्यासह भाजपाच्या २८ नेत्यांची प्रकरणं उघड करणार असल्याचं वक्तव्य केलं आहे.

संजय राऊतांच्या वक्तव्यानंतर भाजपाचे ते २८ नेते कोण? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. ईडीच्या चौकशीच्या फेऱ्यात असलेल्या मोतीलाल ओसवाल कंपनीकडून सोमय्यांच्या युवक प्रतिष्ठानच्या खात्यात लाखो रुपये आले होते. त्यामुळे सोमय्यांचा खरा चेहरा आता उघड झाला आहे. भाजपा भ्रष्टाचारविरोधी लढात कसं काम करतंय हे आता दिसून आलं आहे. त्यांच्याच हातात सगळी सूत्रं आहेत आणि हे महाराष्ट्र भ्रष्टाचार मुक्त करणार का? ज्यांच्या तोंडाला शेणाचा वास येत आहे तेच लोक दुसऱ्याच्या तोंडाचा वास घेणार का?, असा खरमरीत टोला संजय राऊत यांनी लगावला.


# मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात

## उरण-भाऊचा धक्का लाँचसेवा लवकरच होणार सुरळीत

**दै.रायगड नगरी । उरण**

गाळामुळे सातत्याने विस्कळीत होत असलेली उरण भाऊचा धक्का प्रवासी लाँचसेवा सुरळीत करण्यासाठी अखेर मोरा बंदरातील साचलेला गाळ १ मे पासून काढण्याला सुरुवात झाली आहे. मे महिन्यात ते पुरे होईल. कोट्यवधी रुपये खर्चून सुरु केलेल्या गाळ काढण्याच्या कामामुळे आता ओहोटीमुळे प्रवासी वाहतुकीला ब्रेक लागणार नसल्याने दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

मुंबईसाठी शार्टकट व स्वस्त असलेल्या या सागरी मार्गावरील वाहतुकीकडे मेरिटाईम बोर्डाकडून अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे मोरा बंदरातील साचलेल्या गाळामुळे आणि इतर समस्यांमुळे उरण-भाऊचा धक्का ही अत्यंत त्रासदायक ठरू लागली आहे. त्यामुळे या मार्गावरूनलाखोंच्या संख्येने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या आता काही हजारांवर आली आहे.



उरण-भाऊचा धक्का येथील प्रवासी पुल.


उरणच्या मोरा बंदरातून दक्षिण मुंबईत पोहोचण्यासाठी अवघा एक तास ला-गतो. एसटी आणि नवी मुंबईतून ट्रेनने प्रवास केला तरीही प्रवास खर्चासाठी प्रवाशांना ८० ते १०० रुपये मोजावेच लागतात. त्याचप्रमाणे वाढत्या वाहनांमुळे होणारेप्रदूषण वाहतूककोंडी आदीचाही त्रास सहन करावा लागतो. या प्रक्रीयेला सुरुवात झाली असल्याने प्रवाशांना ते सोयीस्कर ठरणार आहे.

जेट्टीवर अनेक समस्याआहेत त्यांचा सामना प्रवाशांन करावा लागत. उरण ते मुंबई लाँचमार्गे प्रवास करीत असताना ८० रुपये मोजावे लागत असून रस्त्याच्या प्रवासापेक्षा निम्म्या वेळेत मुंबईत पोहोचता येते. मात्र, या मार्गाने प्रवास करीत असताना येथील प्रवाशांना अनेक असुविधाना सामोरे जावे लागत आहे. जेट्टीवरच करण्यात येणाऱ्या दुचाकीच्या पार्किंगमुळे प्रवाशाना कसरत करावी लागते.

गाळ काढण्याच्या .../२

# राज ठाकरेंना पुन्हा झेड प्लस सुरक्षा देणार?; वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरू

**दै.रायगड नगरी । मुंबई**



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मशिदीवरील अनधिकृत भोंगे हटवावेत अशी मागणी करत मशिदीसमोर हनुमान चालीसा लावू असा इशारा दिला. त्यानंतर राज्यभरात भोंग्यावरून राजकारण पेटलं. राज ठाकरेंच्या या भूमिकेनंतर त्यांना जीवे मारण्याची धमकी देणारं पत्र आलं आहे. मनसे नेते बाळा नांदगावकर यांनाही असेच पत्र मिळालं आहे. या पार्श्वभूमीवर मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेतली. त्यानंतर आता राज ठाकरे आणि बाळा नांदगावकर यांच्या सुरक्षेत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मनसे नेते बाळा नांदगावकरांनी मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे यांना दिले. ते पत्र वाचून पांडे यांनी सहपो-लीस आयुक्त सुहास वरके यांना याबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानंतर नांदगावकरांनी आज मंत्रालयात दिलीप वळसे पाटील यांची भेट घेतली. गृहमंत्र्यांनी आयुक्तांशी चर्चा करून या पत्राबाबत काय कार्यवाही करायची यावर चर्चा झाली. या पत्राबाबत गुन्हे शाखा तपास करतच आहे परंतु राज ठाकरे, बाळा नांदगावकर यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा विचार सुरू झाला आहे.

.../२

# मध्यप्रदेश सरकारलाही ओबीसी आरक्षण टिकवता आलेले नाही : ना.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला लवकरात लवकर निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याचे निर्देश दिले. ओबीसी आरक्षणाशिवाय राज्यात निवडणुका झाल्यास त्यास महाविकास आघाडी सरकारची दिरंगाई जबाबदार आहे अशी टीका भाजपाकडून करण्यात आली. पण, महाराष्ट्रात होणाऱ्या निवडणुका ह्या ओबीसी आरक्षणाशिवाय होणार नाहीत. महाविकास आघाडी ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे, अशी माहिती राज्य शासनाच्या मंत्र्यांनी दिले. त्यातच भर म्हणून मविआचे मंत्री जयंत पाटील यांनी भाजपालच ओबीसी आरक्षणाबाबत आरसा दाखवला.



राज्यात ओबीसींचे राजकीय आरक्षण टिकलं पाहिजे असा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने केला. दुर्दैवाने सुप्रीम कोर्टाने निर्णय वेगळा दिला. जर आणखीन पुढे दोन-तीन महिने थांबण्याची तयारी ठेवली असती, तर इम्पिरिकल डेटा आला असता आणि सर्व आरक्षण मिळाली असती व सर्वांना न्याय मिळाला

.../२

# लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा २४ वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न

## महामहिम राज्यपाल भगत सिंह कोश्यारी आणि पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी दिल्या ऑनलाईन शुभेच्छा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा २४ वा दीक्षांत समारंभ आज बुधवार, दि.११ मे २०२२ रोजी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली चे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, विद्यापीठ परीक्षा नियंत्रक प्रा.डॉ.विवेक साठे,कार्यकारी परिषदेचे सदस्य प्राचार्य नागेश आलुरकर, प्रा.एस.एल.नलबलवार, प्राचार्य व्ही.के.रेदासनी, प्राचार्य उल्हास शिंदे, प्राचार्य राहुल बारजिभे, प्राचार्य अभिजीत वाडेकर, प्राचार्य किशोर ओतारी, प्राचार्य नरेंद्र कान्हे, डॉ.श्रीमती एम.डी.लड्डा, डॉ. विवेक वाडके, श्रीनिवास बेंडखळे, राजेश पेडणेकर, प्राचार्य दिनकर घेवाडे, डॉ. अमित शेष, विद्यापीठातील इतर प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी दीक्षांत समारंभास उपस्थित विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करताना महामहिम राज्यपाल व

.../२

# राजद्रोहाचा पोरखेळ

ब्रिटिश साम्राज्याचा कारभार हाकण्यासाठी राजनिष्ठ मानसिक गुलाम शिक्षणातून कसे घडविता येतील, याची चिंता करणारा लॉर्ड मेकॉले हाच राजनिष्ठेच्या नाण्याची दुसरी बाजू असणारा राजद्रोह निपटून काढण्यासाठी तयार झालेल्या कलमांचा मूळ पुरुष आहे. मेकॉलेने १९३७मध्ये भारतीय दंडविधानाची संहिता तयार केली, तेव्हा त्यात राजद्रोहाचे कठोर कलम घातले. पुढे १८५७च्या स्वातंत्र्य युद्धानंतर राणीची थेट सत्ता आली आणि इंग्रज राज्यकर्त्यांना या कलमाची गरज चांगलीच पटली. सन १८६०मध्ये या कायद्यावर आणि राजद्रोहाच्या कलमांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानंतर, गेली १६० वर्षे भारतातील सर्व राज्यकर्ते ही राजद्रोहाची कलमे वापरत आले आहेत. स्वातंत्र्यानंतर ही कलमे काढून टाकण्यास किंवा सौम्य करण्यास पंडित जवाहरलाल नेहरू यांनीही कसा विरोध केला होता, याचे दाखले आजही दिले जात असले, तरी गेल्या काही काळात ज्या बेछूटपणे या कलमाचा वापर केला जातो आहे, तो पाहता सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंडविधानाच्या कलम १२४ आणि १२४-अ यांच्या आजच्या प्रस्तुततेचा प्रश्न हाती घ्यावा, यात नवल नाही; किंबहुना ते आवश्यकच आहे. आता केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात या कलमांचा फेरविचार करण्यास सरकार अनुकूल आहे, असे सूचित केले आहे. त्याचवेळी, केंद्रीय कायदेमंत्री किरण रिजिजू हे मात्र ही कलमे संपूर्णपणे जाण्याऐवजी त्यांचा विवेकाने वापर करण्यावर भर देत आहेत. केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने; तसेच महाराष्ट्रासहित अनेक राज्य सरकारांनी या कलमांचा विवेकाने आणि गांभीर्याने वापर केला का, असा प्रश्न उपस्थित होतो. उलट, या कलमांचा अनुचित वापर झाल्यामुळेच आज त्यांच्याकडे पुन्हा एकदा पाहण्याची गरज सर्वोच्च न्यायालयाला वाटते आहे. भारत स्वतंत्र झाला, तेव्हापासून आजतागायत भारतीय एकात्मतेला असणारे धोके पूर्णपणे संपले आहेत, असे म्हणता येत नाही. नक्षलवाद, ईशान्य भारतातील बंडाळी, काही काळ पेटलेले स्वतंत्र खलिस्तानचे आंदोलन, वारंवार डोके वर काढणारा इस्लामी दहशतवाद हे आणि इतरही अनेक धोके आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी जसे स्वतंत्र कायदे आहेत, त्याचप्रमाणे आहेत त्या कायद्यांमध्येही तरतूद असण्यात काही गैर नव्हते; मात्र गेल्या काही वर्षांमधील आकडेवारी पाहिली, की राजद्रोहाचा आरोप ठेवण्याचा सगळ्या यंत्रणांनी कसा पोरखेळ करून ठेवला आहे, हे लक्षात यावे. भारतीय दंडविधानाच्या कलम १२४-अ खाली गुन्हे नोंदविले जाण्याचे प्रमाण सन २०१५पासून सातत्याने वाढते आहे. २०१५ ते २०२० या काळात या कलमाखाली ३५६ गुन्हे नोंदविण्यात आले. ५४८ जणांना अटक करण्यात आली. ही आकडेवारी पाहिली, तर देशात राजद्रोह म्हणजे 'सिडिशन' करणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे, असाच समज होईल; मात्र याच काळात यातील केवळ सात खटल्यांचा निकाल लागला. या खटल्यांतील केवळ १२ आरोपींना शिक्षा झाली आहे. तीही शिक्षा वरच्या न्यायालयांमध्ये किती प्रकरणांत कायम होईल, हे पाहावेच लागेल. ही आकडेवारी काय सांगते? राजद्रोहाचे कलम लावताना पोलिस किंवा त्यांच्यावर दबाव आणणारे नोकरशहा अथवा राज्यकर्ते विवेकाने वागत नाहीत, हेच यातून दिसते आहे. यातील, याहून अधिक गंभीर बाब म्हणजे, अटक झालेल्या संशयित आरोपींमधील ५३ टक्के हे १८ ते ३० या वयोगटातील आहेत. ३५ टक्के ३० ते ४५ या वयोगटातील आहेत. याचा अर्थ, राजद्रोहाच्या कलमाची तप्तमुद्रा या तरुणांच्या कपाळावर मारून, साऱ्या यंत्रणा त्यांना कायमचे आयुष्यातून उठविण्याचे पाप करीत आहेत. यावर प्रश्न असा येतो, की यातील काही आरोपी खरोखरच गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकले असतील तर? मात्र, अशा गुन्हेगारांसाठी भारतीय दंडविधानात १२१ या खास कलमाची तरतूद आहे. 'सरकारच्या विरोधात युद्ध पुकारणे' असेच ते कलम आहे. ते वापरता येतेच. या शिवाय, 'यूएपीए' व 'पोटा' हे कायदे त्यासाठीच तयार करण्यात आले होते. मग राजद्रोहाचे कलम का वापरले जाते? याचे कारण, साधी सरकारविरोधी घोषणा, चित्र, व्यंगचित्र, कविता, भाषण यांतील कोणतीही कृती राजद्रोहाच्या कलमाखाली टाकून अडकवता येते. खरे तर, लोकशाही राज्यातील विरोधाच्या अभिव्यक्तीवर सरळच अंकुश आणणारी ही कृती असते; त्यामुळेच अनेकदा न्यायालयांना राजद्रोहाच्या कलमाच्या बेगुमान वापराबद्दल ताशेरे झाडावे लागतात. सध्याही तसे होताना दिसते आहे. या कलमाचा इतका मनमानी गैरवापर राज्य सरकारे आणि केंद्र सरकार विरोध दडपून टाकण्यासाठी करणार असतील, तर त्यांच्यात आणि इंग्रज सरकारमध्ये फरक तो काय राहिला? असे असेल, तर सर्वोच्च न्यायालयाने घटनापीठ बसवून हे कलम भारतीय राज्यघटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावणारे म्हणून रद्दबातल केले, तरी काही बिघडत नाही. केंद्र सरकारने आपली आधीची भूमिका काहीशी मवाळ केल्यासारखे दिसते आहे. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालय पुन्हा सुनावणीसाठी घेणारच आहे. देशद्रोह (ट्रीजन) आणि राजद्रोह (सिडिशन) हे अत्यंत गंभीर गुन्हे आहेत. त्यांचा बंदोबस्त हीदेखील तितकीच गंभीर कृती असायला हवी. सध्या सगळ्याच यंत्रणांनी राजद्रोहाचा पोरखेळ करून ठेवला आहे. त्यांना त्यांची जागा दाखवायलाच हवी.

# भंगार व कचरा गोळा करणाऱ्या अश्रफ व अमित यांनी घडवले माणुसकीचे दर्शन ; सापडलेले सामान केले परत

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यात भंगार व कचरा गोळा करणाऱ्या दोघांनी माणुसकीचे दर्शन घडविल्याची घटना उरण मध्ये घडली आहे.आजही माणुसकी जिवंत असल्याचे उदाहरण सर्वांना एकदा अनुभवास मिळाले.

सविस्तर घटना अशी की ७ मे रोजी मासेमारी व्यवसाय असणाऱ्या करंजा कासवले पाडा येथील रहिवासी ३३ वर्षीय सुशाली धनंजय नाखवा यांची १० वर्षीय मुलगी विधी धनंजय नाखवा हीची प्रकृती बिघडली. तिच्यावर औषधोपचार करण्यासाठी त्यांची अँक्टीव्हा मोटार सायकल घेऊन ते करंजा कासवले पाडा ते नाखवा हॉस्पीटल, कोटनाका येथे जात असताना त्यांच्या जवळ असलेल्या काळ्या रंगाच्या पर्स मध्ये १० हजार रुपये रोख रक्कम, विवो कंपनीचा मोबाईल फोन व मुलीच्या औषधोपचारा करीता पैसे कमी पडत असल्याने सोनाराकडे गहाण ठेवण्याकरीता सोबत ठेवलेले साडेतीन तोळे सोन्याचे मंगळसुत्र असे आनंदी हॉटेल जवळ आले असता रस्त्यात पडुन गहाळ झाले.

ही पर्स परत मिळावी या करिता तक्रार देण्यासाठी त्या उरण पोलीस ठाणे येथे आल्या. त्यावेळी उरण पोलीस ठाणे येथे रस्त्यावर भंगार व कचरा गोळा करणारे अश्रफ असगर शेख वय १८ वर्ष व अमित लालजी चौधरी, वय २३ वर्ष दोन्ही रा.बोरी पाखाडी हे उरण पोलीस ठाण्यात आले व त्यांनी आंनदी हॉटेल जवळील पेट्रोल पंपसमोरील रस्त्यावर सापडलेली काळ्या रंगाची पर्स व त्यात असलेले सोन्याचे मंगळसुत्र, १० हजार रुपये रोख रक्कम व मोबाईल फोन मुळ मालकाला परत मिळावा या करिता त्यांना मिळालेली पर्स ते जमा करण्यासाठी पोलीस ठाण्यात आले.

यावेळी त्यांनी जमा केलेली पर्स सुशाली नाखवा यांना दाखवुन व खात्री करून या प्रकरणी पोलीस ठाण्यात आलेल्या अश्रफ असगर शेख व अमित लालजी चौधरी यांना सुशाली नाखवा यांच्या समोर हजर केले. या दोघांनी प्रमाणिकपणे रस्त्यावर सापडलेली काळ्या रंगाची पर्स व त्यातील १० हजार रुपये रोख रक्कम, विवो कंपनीचा मोबाईल फोन व साडे तीन तोळ सोन्याचे मंगळसुत्र हे सुशाली धनंजय नाखवा यांना परत करुन उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगिरी करत माणुसकीचे दर्शन घडविले. आजच्या स्वार्थी दुनियेतही दाखविलेल्या माणुसकी मुळे, प्रामाणिकतेमुळे उरण पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील व त्यांच्या टीम ने अश्रफ असगर शेख, अमित लालजी चौधरी यांचा रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व कौतुक केले.

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्तपदांसाठी ५ जूनला मतदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पालघर, धुळे, नंदुरबार, वाशीम, नागपूर आणि अकोला जिल्हा परिषदेतील २ निवडणूक विभागांच्या आणि पंचायत समितीतील ६ निर्वाचक गणांच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी ५ जून २०२२ रोजी मतदान; तर ६ जून २०२२ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयोगाने आज केली.

नंदुरबार जिल्हा परिषदेच्या चितवी (ता. नवापूर) आणि अकोला जिल्हा परिषदेच्या हातरुण (ता. बाळापूर) या निवडणूक विभागासाठी ही पोटनिवडणूक होत आहे. पोशेरा (मोखाडा, जि. पालघर), हिसाळे (शिरपूर, जि. धुळे), हट्टी खु. (साक्री, जि. धुळे), असली (अक्राणी, जि. नंदुरबार), ब्राम्हणवाडा न- मारसुळ (मालेगाव, जि. वाशीम) आणि चणकापूर (सावनेर, जि. नागपूर) या पंचायत समित्यांच्या निर्वाचक गणांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील मतदान होईल. संबंधित निवडणूक विभाग आणि निर्वाचक गणांत आजपासून आचारसंहिता लागू झाली असून निकाल जाहीर होईपर्यंत ती लागू राहील. नामनिर्देशनपत्र १७ ते २३ मे २०२२ या कालावधीत दाखल करता येतील. २२ मे २०२२ रोजी रविवारच्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी २४ मे २०२२ रोजी होईल. ५ जून २०२२ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल. मतमोजणी ६ जून २०२२ रोजी सकाळी १०.०० वा. सुरू होईल.

# पोलीस पाटील कै. स्मिता म्हात्रे यांच्या कुटुंबियांना पनवेल तालुका पोलिसांनी केली आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील वावंजे गावात पोलीस पाटील म्हणून कार्यात असलेल्या कै. स्मिता ज्ञानदेव म्हात्रे यांचे नुकतेच देवदर्शनासाठी आपल्या कुटुंबियांसह गेल्या असताना त्यांचे तेथे दुःखद निधन झाल्याने सामाजिक बांधिलकी जपत आज पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वतीने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यात आली.

वावंजे गावात पोलीस पाटील म्हणून कार्यरत असलेल्या कै. स्मिता ज्ञानदेव म्हात्रे या आपल्या कुटुंबियांसह वैष्णोदेवी येथे देवदर्शनासाठी गेल्या असताना तेथे त्यांना हृदय विकाराचा झटका आल्याने त्याचे दुःखद निधन झाले होते. त्यांनी आत्ता पर्यंत केलेल्या कामाची दखल घेत आज पोलीस पाटील यांच्या बैठकीमध्ये पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे, तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौडकर, पोलीस निरीक्षक अंकुश खेडकर, पोलीस उपनिरीक्षक उमेश गुटाळ, गोपनीय विभागाचे सचिन होळकर आदींच्या उपस्थित पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौडकर यांनी म्हात्रे कुटुंबियांना पोलीस ठाण्याच्या वतीने आर्थिक मदत केली. त्याच प्रमाणे त्यांच्या मुलाला पुढील शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास त्याला सुद्धा सर्वोतोपरी सहकार्य करू असे आश्वासन वपोनि रवींद्र दौडकर यांनी दिले.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात

कामामुळे प्रवाशांना सतावणारी गाळाची समस्या दूर होणार असल्याची माहिती मोरा बंदर निरीक्षक प्रभाकर पवार यांनी दिली, त्याच प्रमाणे जेट्टी च्या दुरुस्ती बाबत हेड ऑफिस ला त्या विषयी कळविले आहे त्याचे काम प्रोसेस मध्ये आहे असेही पवार यांनी सांगितले तर सुमारे तीन लाख प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याच्या प्रतिक्रिया मुंबई जलवाहतूक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केल्या जात

बदरात सातत्याने गाळ साठत असल्याने विशेषतः समुद्राच्या ओहोटीमुळे प्रवासी लाँचस जेटीला लागत नाहीत, तर मोठ्या प्रमाणावर साचणाऱ्या गाळामुळे प्रवासी लॉचेस लावतानाही वेळ लागतो, तर कधी कधी नवख्या सारंग-ड्रायव्हरमुळे लॉचेस गाळात रुतून बसतात. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यामुळे प्रवासी संतप्त होतात. ओहोटीमुळे ठरावीक कालावधीसाठी प्रवासी वाहतूक सेवा बंद ठेवण्यात येते. कधी कधी चार-पाच दिवस प्रवासी वाहतूकच बदच ठेवण्यात येत असल्याने मोठी गैरसोय होते, याकडे प्रवाशाना सुविधा पुरविणाऱ्या महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाचेही दुर्लक्षच कारणीभूत ठरत असल्याचे प्रवाशाकडून सांगितले जात आहे.

## राज ठाकरेंना पुन्हा झेड प्लस सुरक्षा देणार?; वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरू

२०२० पर्यंत राज ठाकरेंना झेड प्लस सुरक्षा होती. परंतु ठाकरे सरकारनं या सुरक्षेत कमी करून वाय प्लस दिली होती. मात्र आता राज ठाकरेंना मिळणाऱ्या धमक्या पाहता वरिष्ठ पोलीस पातळीवर सुरक्षा वाढवण्याच्या हालचाली सुरू आहे. बाळा नांदगावकर हे माजी गृहराज्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे सध्या कॉन्स्टेबल सुरक्षेसाठी आहे. परंतु धमकीच्या पत्रामुळे नांदगावकर यांच्याही सुरक्षेत वाढ करण्याचा विचार सुरू आहे.

## मध्यप्रदेश सरकारलाही ओबीसी आरक्षण टिकवता आलेले नाही : ना.जयंत पाटील

असता सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला आहे त्यावर काही विधान करायचं नाही. परंतु मध्य प्रदेशमध्ये सुध्दा भाजपला ओबीसी आरक्षण टिकवता आले नाही, अशा शब्दात जयंत पाटील यांनी भाजपावर टीका केली.

ओबीसींच्या आरक्षणविरोधी भूमिका महाविकास आघाडी सरकारने घेतली हे विरोधकांचे आरोप खोडसाळ आहेत. मुळात भाजपची सत्ता असताना ओबीसींना ते आरक्षण देऊ शकले नाहीत. आता सुप्रीम कोर्टाने निवडणुका घेण्याचा निर्णय दिला आहे. त्यानुसार तयारी सुरू आहे. इम्पिरिकल डेटा गोळा करणारी समितीने दोन-तीन महिन्यात डेटा गोळा केला असेल तर कदाचित निवडणुका होऊ शकतात. परंतु ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होऊ नयेत या भूमिकेवर महाविकास आघाडी सरकार असून सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा अवमान करणार नाही. प्रयत्न दोन्ही बाजुने सुरू आहेत, असे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

## लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा २४ वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न

विद्यापीठाचे कुलपती भगत सिंह कोश्यारी यांनी संपूर्ण जग विविध क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे. आत्मनिर्भर भारत बनविण्यात तांत्रिक विभागाचा मोठा सहभाग असून तांत्रिक विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी नवनवीन संकल्पनांचा शोध लावून देश घडवतील, असा विश्वास व्यक्त करून सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनीही पदवीप्राप्त सर्व विद्यार्थ्यांची वाटचाल भरभराटीची होवो, अशा ऑनलाईन शुभेच्छा देत विद्यापीठाबाबतच्या प्रलंबित बाबी शासन स्तरावरून प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील,अशी ग्वाही दिली.

समारंभाचे प्रमुख अतिथी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्लीचे अध्यक्ष प्रा.डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे म्हणाले की, अनेक अडचणींवर मात करून काम करून दाखविणे हे कौतुकास्पद आहे. शिवरायांची राजधानी असलेला हा लढवय्या जिल्हा आहे. संकटांचे संधीत रूपांतर करण्याचे आव्हान पेलणे अतिशय महत्त्वाचे आहे. नव्या केंद्रीय शैक्षणिक धोरणाचा अवलंब केल्याने येणारा काळ निश्चित बदलेल. ध्येय प्राप्तीसाठी मेहनत केल्याने, समर्पित झाल्याने बदल निश्चितच होईल.

ते म्हणाले, सर्वांगीण विकास झालेला नागरिक घडविणे, हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे. विविध विषयांची माहिती करून घेणे, त्यांचा योग्य ठिकाणी वापर करणे, सामाजिक दायित्व निभावणे, हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. कोणतेही क्षेत्र आता एकांगी राहिलेले नाही, प्रत्येक क्षेत्र विविधांगी घटकांनी मिळून बनत आहे. विविध विषयांचे ज्ञान मिळविणे, विविध विषय हाताळणे आजच्या काळाची गरज आहे. स्वयंम या भारतीय ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून ज्ञान मिळवू पाहणाऱ्याना अनेक प्रकारचे ऑनलाईन कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोविड काळात शिक्षण बंद होऊ न देण्याचे आव्हान सर्वांनी यशस्वीरित्या पेलले. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आपण शिक्षण प्रक्रिया सुरूच ठेवली.

प्रा.डॉ.सहस्त्रबुद्धे पुढे म्हणाले की, पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिक ज्ञान व अनुभवदेखील आवश्यक आहे. विविध कंपन्यांबरोबर इंटर्नशीपकरिता सामंजस्य करार करावेत. -खउढ ने तयार केलेल्या वेबपोर्टलवर इंटर्नशीपकरिता ०१ कोटी भारतीय विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. स्टार्ट अप संकल्पना अंमलात आणणारा आपला भारत देश जगातील तिसऱ्या क्रमांकावरील सर्वात मोठा देश ठरला आहे. जगातील जवळपास ४१ युनिकॉर्न मोठ्या मोठ्या कंपन्यांनी एक बिलियन डॉलर्सची गुंतवणूक भारतात करण्यासाठी तयारी दर्शवली आहे. देशातील विविध भागातून शहर, गावातून नवनवीन संकल्पना घेऊन अनेक विद्यार्थी पुढे येत आहेत. स्वच्छ भारत, डिजिटल इंडियाच्या माध्यमातून आपल्या देशाचा विकास होत आहे. पुढील दोन वर्षात भारत नेट प्रकल्पाच्या माध्यमातून देशातील सर्व गावे इंटरनेटद्वारे जोडले जाणार आहेत, त्या माध्यमातून शिक्षण दिले जाणार आहे. विविध खेळणी बनविण्यात आपला देश पुढे जाऊ शकतो. भारतीय संस्कृतीवर आधारित खेळणी बनविण्याचे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे. आयुष्यात शॉर्टकट नको, कुठल्याही मोहात पडू नये, तत्वांशी प्रामाणिक राहावे, नवे प्रयत्न करीत राहणे, चुकांमधून शिकणे, रोज काहीतरी नवे आत्मसात करणे, आयुष्यभर शिकण्याची प्रवृत्ती जोपासणे, हे यशस्वी आयुष्यासाठी आवश्यक आहे. आजच्या तंत्र युगामध्ये मानवी संबंध टिकविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी कुटुंब, शैक्षणिक संस्था यांच्याशी आपले असलेले नाते कायमस्वरूपी टिकवून ठेवणे आजच्या काळाची गरज आहे.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत आणि विद्यापीठ गीताने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलसचिव प्रा.डॉ.भगवान जोगी यांनी केले. कुलगुरू प्रा.डॉ.कारभारी विश्वनाथ काळे यांनी प्रास्ताविक केले. तसेच याप्रसंगी त्यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवालही सादर केला. तद्नंतर पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदवीदान समारंभ संपन्न झाला.

# सुरक्षित शाळा प्रवेश उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्वही समजावून सांगणार : ना.आदित्य ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सुरक्षित शाळा हा प्रत्येक विद्यार्थ्यांचा अधिकार असून वाढते शहरीकरण आणि रहदारीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शाळेत सुरक्षितपणे जाता-येता यावे या उद्देशाने मुंबईतील महापालिकेच्या शाळांमध्ये 'सुरक्षित शाळा प्रवेश' उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व देखील समजावून सांगितले जाणार असल्याचे ते म्हणाले.

पालकमंत्री आदित्य ठाकरे यांच्यासह नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड, मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री असलम शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबई महानगरपालिकेच्या शाळा परिसरात सुरक्षित शाळा प्रवेश उपक्रमाचा उद्घाटन समारंभ झाला. मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, खासदार अरविंद सावंत, मनपाचे सहआयुक्त अजित कुंभार, शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, मनपाच्या माजी शिक्षण सभापती संध्या दोशी, माजी शिक्षण समिती सदस्य साईनाथ दुर्गे आदी यावेळी उपस्थित होते.

श्री.ठाकरे म्हणाले, सुरक्षित शाळा उपक्रमांतर्गत शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांची मानसिक आरोग्य, मौखिक आरोग्य, मधुमेह आदींची नियमित तपासणी करण्यात येणार आहे. राज्य आणि देशाची प्रगती करणे आवश्यक असेल तर शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, याच उद्देशाने मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सध्या आठ भाषांमध्ये शिक्षण दिले जात असून एसएससी प्रमाणेच सीबीएसई, आयसीएसई बोर्डाची शिक्षण सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. लवकरच आंतरराष्ट्रीय बोर्डाची शिक्षण पद्धती देखील सुरू करण्यात येणार आहे. मागील वर्षी मनपाच्या शाळांमधील चार हजार जागांसाठी दहा हजार अर्ज प्राप्त झाले होते, यावर्षी देखील केवळ १५ दिवसांत ३५ हजार अर्ज प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

काही वर्षांपूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गळती होत असे. आता हे चित्र बदलले असून केवळ 'राईट टू एज्युकेशन' नव्हे तर 'राईट टू कॉलिटी अँड सेफ एज्युकेशन'वर भर दिला जात असल्याचे श्री.ठाकरे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा शाळेवर आणि शाळेतील शिक्षकांवर विश्वास असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच शाळेतील पायाभूत सोयी-सुविधा आणि अन्य उपक्रम राबविण्याला प्राधान्य दिले जात आहेत. मुंबई मनपाच्या शाळांमधून शिक्षण आणि अन्य उपक्रमांसाठी शिक्षकांबरोबरच सामाजिक संस्थांचाही मोठा सहभाग लाभत असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंबईत टॅक्टिकल अर्बनिझम अंतर्गत रस्त्यांवरील सुरक्षिततेला महत्त्व दिले जात आहे, याचाही विद्यार्थ्यांना लाभ होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत लवकरच वाघोबा क्लब, स्ट्रॉनॉमी क्लब सुरू करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना दर्जेदार अन्न पुरविण्यासाठी अक्षय पात्र, अक्षय चैतन्य यांचा सहभाग घेतला जात असल्याचे ते म्हणाले. यापुढे सुरक्षित रूग्णालये तसेच सुरक्षित धार्मिक स्थळे हे उपक्रम राबवायचे असून 'सुरक्षित शाळा प्रवेश' हा उपक्रम राज्यात सर्वत्र सुरू व्हावा, यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, शाळांमधून जीवनाला आकार देण्याचे काम केले जाते. या अनुषंगाने महानगरपालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये आता सुरक्षित शाळा प्रवेश उपक्रमाची भर पडत आहे. सर्वच महानगरपालिकांमधून शैक्षणिक बाबींसाठी निधी खर्च होतो, त्याअंतर्गत शैक्षणिक उपक्रमांसह क्रीडा, आरोग्य, रस्ते सुरक्षा, पायाभूत सोयी-सुविधा, तंत्रज्ञानाचा अंगिकार, दर्जेदार अन्नपुरवठा आदी माध्यमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. सुरक्षित शाळा प्रवेश हा स्तुत्य उपक्रम असून यापुढे राज्यात सर्व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जाईल, असे त्यांनी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका राहत्या घराचा कडी-कोयंडा उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून कपाटामधील लाखो रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना पनवेल जवळील वडघर येथे घडली आहे. अतुल प्रकाशे (वय ३२) हौशा रेसिडेन्सी, वडघर यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा उचकटून आत प्रवेश करून कपाटामधील लाखो रुपये किमतीचे दागिने त्यामध्ये सोन्याची चैन, सोन्याची अंगठी, नथ, झुमके, चांदीचा छल्ला असा मिळून १ लाख १५ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## घरात प्रवेश करून लॅपटॉपसह चेकबुकची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील एका घरात प्रवेश करून चोरट्यांनी वीस हजार रुपये किमतीचा लॅपटॉप आणि चेक बुक चोरी केल्याची घटना घडली आहे चोरट्यांनी विरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राचीन हेल्थ केअर हॉस्पिटलजवळ गोविंद निलायम को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी मध्ये वेमुला रेड्डी राहतात. त्यांना त्यांच्या रूमच्या बाहेरील दरवाजा उघडा असल्याचे दिसले. त्यांनी आत जाऊन पाहिले असता लॅपटॉपची बॅग दिसून आली नाही. या बॅगेमध्ये लॅपटॉप व चेक बुक होते.

## गाडीच्या सायलेन्सरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका चार चाकी वाहनाच्या सायलेन्सरची चोरी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील केळवणे गावाच्या हद्दीत घडली आहे. प्रवचन शेडगे यांनी नवीन चार चाकी गाडीखरेदी केली होती. त्या गाडीचा अचानक आवाज येऊ लागल्याने ती गाडी गॅरेजमध्ये दाखवली असता गॅरेजवाल्याने गाडीला सायलेन्सरच नसल्याचे सांगितल्याने केळवणे गावाच्या बस स्टॉप जवळून अज्ञात चोरट्याने सदर गाडीचा सायलेन्सर चोरल्याचे प्राथमिक तपासात माहिती मिळाली आहे त्यानुसार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात याबाबतची तक्रार देण्यात आली आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# बोरघर आणि गोवेले ग्रामपंचायतीमध्ये विभागलेल्या महादेवाचा मुरा पर्यटनस्थळ रस्त्याच्या कामाला गती

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील महादेवाचा मुरा या दूर्गम पर्यटनस्थळ असलेल्या महसूली गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला यंदा गती प्राप्त झाली असून साधारणपणे ३ कोटी ५५ लाख १६ हजार ९०१ रूपयांच्या निविदा मंजूरीनंतर दोन ठेकेदारांना या रस्त्याचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. या कामात गेल्या दोन-तीन महिन्यांपासून सतत रखडपट्टी होत असल्याने आगामी पावसाळ्यापर्यंत या रस्त्याचे काम पूर्णत्वास जाण्याबाबत साशंकता निर्माण झाली होती. मात्र, येथील जागृत मुंबईकर ग्रामस्थ मिलींद पवार यांनी याप्रकरणी सातत्याने पाठपुरावा केल्याने या कामाला गती आणण्यासाठी प्रशासनावर आणि ठेकेदारावर मंत्रालय पातळीवरून आदेश झाल्याची माहिती प्राप्त झाली.



पोलादपूर तालुक्यातील बोरघर आणि गोवेले या दोन ग्रामपंचायतीमध्ये विभागलेल्या महादेवाचा मुरा या महादेव कोळी समाजाची लोकवस्ती असलेल्या महसूली गावात रस्ता नेण्यासाठी माजी आमदार स्व. माणिक जगताप यांनी २०१० पासून केलेले प्रयत्न कालांतराने अर्ध्यावर सोडून देण्यात आले होते. त्यानंतर गेल्या पावसाळ्यामध्ये महादेवाचा मुरा गावापर्यंत भगदाडं पडलेल्या रस्त्यावरून लोकवस्तीला अन्नधान्य व अन्य औषधोपचारासाठी कोणत्याही प्रकारची सुविधा नसल्याने ग्रामस्थांची पायपीट सुरू झाली.

मुख्यमंत्री सामाजिक ग्रामपरिवर्तन अभियानामध्ये बोरघर आणि गोवेले या दोन ग्रामपंचायतींचा समावेश असूनही दोन्ही ग्रामपंचायतींमध्ये विभागलेल्या महादेवाचा मुरा या महसूली गावाचा विकास करण्याची राजकीय मानसिकता हे गाव वंचित राहिले आहे.

महादेवाचा मुरा येथील ग्रामस्थांनी पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांची मुंबई येथे मंत्रालयामध्ये थेट भेट घेऊन या गावाच्या रस्त्याची मागणी केली. गेल्या वर्षी महादेवाचा मुरा पर्यंत रस्त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन रस्त्यासाठी आर.के.चंदनानी यांनी ३ कोटी आणि पुलासाठी संजय अनिल शेठ यांना ५५ लाख १६ हजार ९०१ रूपयांची निविदा मंजूर होऊन कार्यारंभ आदेश दि.२३ डिसेंबर २०२१ रोजी देण्यात आले. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून या कामाला गती प्राप्त न झाल्याने यंदाच्या पावसाळ्यातही रस्त्याचे काम रडतखडत सुरू राहिल्यास ग्रामस्थांची पायपीट कायम राहण्याची लक्षणे दिसून येत होती.

यामुळे मिलींद पवार या तरूण ग्रामस्थाने नेहमीप्रमाणे गावाच्या विविध विकासकामांच्या पाठपुरावा करण्याच्या भुमिकेतून मंत्रालयस्तरावरून ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासनावर दबाव आणून या कामाला गती प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे साखर तळ्याची वाडी ते गोवेले रस्ता आणि पुल या दोन्ही कामाला एप्रिल महिन्यात गती प्राप्त झाली आहे. मात्र, या कामाचा दर्जा व गुणवत्ता नियंत्रण याबाबत सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूरकडून विशेष लक्ष ठेवले जात नसल्याने पोलादपूर तालुक्यातील महादेवाचा मुरा येथील ग्रामस्थांच्या मागणीवरून मंजूर झालेले काम राजकीय ठेकेदारांचा स्वाभिमान दुखावल्याने कसे होईल, हे सांगता येणार नसल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहे.

# माथेरानमध्ये आठ दिवसाचे मोफत योग शिबिर सुरू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

उत्तम आरोग्यासाठी योगसाधना हा एकमेव चांगला पर्याय असल्याने माथेरान मधील नागरिकांच्या स्वास्थ्य आरोग्यासाठी आठ दिवस मोफत योगाशिबिर सुरू करावे या हेतूने माथेरानच्या सरस्वती शाळेत शिक्षण घेतलेल्या आणि पुण्यात कॉलेज शिक्षणा सोबत योगाचे देखील शिक्षण पूर्ण केले आहे त्या येथील रवींद्र हेंद्रे यांची मुलगी पौर्णिमा चांदवले या पुण्यात टाटा कंपनीच्या व इतर कॉर्पोरेटस मध्ये योग प्रशीक्षणाचे क्लास घेत असतात.

माथेरान आपले गाव असल्याने इथे योगाचे क्लास घेण्याची इच्छा त्यांनी सामाजिक कार्यकर्त्या वर्षा सुनील शिंदे यांच्याकडे व्यक्त केली त्यानुसार दि.१०मे पासून असेंब्ली हॉल येथे सुरू केले. सुरुवातीला त्यांनी योगसाधना, ध्यान, ओंकार साधना, एरंबिक, प्राणायाम हे शिकवीत आहेत. त्याना त्यांच्या या योगा शिक्षकी पेशात अनेक अशा शिबिरामध्ये जाण्याचा योग आला कारण डिपार्टमेंटचे आदेश निघायचे त्यावेळेस त्या जायच्या मात्र आज पौर्णिमा चांदवले ज्या आवडीने योगा शिकवत आहेत यातून त्यांचे योगा बाबतीत असणारे ज्ञान व आवाजातील गोडवा सर्वांना प्रोत्साहित करीत होता माझ्या गावात शिबीर घेते याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यातून व्यक्त होत होता .

योग गुरू रामदेव बाबा यांचे शिष्य मुंबईत अशी शिबिर आयोजित करीत असतात त्याची फी हजार रुपयांच्या पुढे असते योगाशिक्षिका पौर्णिमा यांचे मोफत शिबिराचा माथेरान करांनी लाभ घ्यावा असे आवाहन वर्षा शिंदेंनी केले आहे त्यास सध्यातरी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे.



# उरणमध्ये उन्हाच्या झळाळीमुळे उसाच्या रसाला अधिक मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उन्हाच्या झळा दिवसेंदिवस कमालीची वाढ होऊ लागल्याने उरणकर त्रस्त झाले आहेत. उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे शहराच्या विविध रस्त्यांवरील असलेली रसवंतीगृहे अथवा पारंपरिक पद्धतीने रस विकणारे छोटे रसविक्रेते यांच्या ठेल्यावर मोठी गर्दी होत आहे. रणरणत्या उन्हात उसाचा ताजा रस प्यायल्याने सगळा ताणतणाव, थकवा दूर होत असून पुन्हा कामासाठी नवचैतन्य संचारते, उरण शहरात नयन अपार्टमेंट समोर, पालवी हॉस्पिटल, उरण चारफाटा, कोट नाका, पेन्शनर पार्क आदी ठिकाणी उसाच्या रसाची दुकाने सुरू आहेत.

महाराष्ट्र राज्यासह उरण शहरात कमालीची उष्णता वाढल्याने नागरिकांना उन्हाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अशातच सेल्समन, फिरतीवर काम करणारे कामगार, लहान मुले, महिलावर्ग, वयस्कर मंडळी आदीच्या शरीराची उन्हाळ्यात लाहीलाही होत आहेत्या मुळे उन्हाचा चटका वाढताच रसवंतीतील लगबग वाढली आहे. उष्णता कमी करून थकवा दूर करणारे सर्वांचे आवडते पेय म्हणजे उसाचा रस, यामुळे मागील काही दिवसा पासून रसवंती गृहाकडे नागरिकांची गर्दी वाढत आहे.

गरीब कुटुंब पारंपरिकता हातगाड्यावर लाकडी रस मशीन द्वारे तर काही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने उसाचा रस विकून उदरनिर्वाह करतात. काम दिवसाला दोन ते तीन लिटर इंधनाचा वापर करून मशीन द्वारे रस काढला जातो. परंतु ग्राहकांची पसंती लाकडाच्या गाडीवर पारंपारिक पद्धतीने पिळलेल्या जाणाऱ्या रसाला अधिक पसंती आहे. परंतु त्यामुळे उन्हाचा चटका वाढताच रसवंतीतील ग्राहकांची पसंती लाकडाच्या गाडीवर पारंपरिक लगबग वाढली आहे. उष्णता कमी करून पद्धतीने पिळल्या जाणाऱ्या रसाला आहे.

उन्हाळ्यात चार महिने ऊसाच्या रसाला वाढत्या उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणत मागणी असते. विशेषकरून ग्राहक बर्फ टाकलेला उसाचा रस प्यायला जास्त उत्साहात असतात. सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत ग्राहकांची खूप गर्दी असते. काही रसवंत्या वर्षभरही चालवल्या जातात. तर उन्हाळ्यात व्यवसाय म्हणून चार महिन्यांसाठी गुंतवणूक करून रसवंती थाटणाऱ्यांची संख्याही या काळात चांगलीच वाढली आहे.



# पनवेलमध्ये नेव्हीतील सेवानिवृत्त अधिकाऱ्याला त्रिकुटाने लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बीएमसीतील अधिकारी असल्याचे सांगून तिघा लुटारुंनी नेव्हीतील एका सेवानिवृत्त अधिकाऱयाजवळची ४५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने लुटून पलायन केल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या त्रिकुटाविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार विजयकुमार शर्मा (६४) हे पनवेलच्या तक्का गाव परिसरात राहण्यास असुन ते नेव्हीमधून सेवानिवृत्त झाले आहेत.

शर्मा हे आपल्या कारने पत्नीसह रायगड बाजार येथे खरेदीसाठी गेले होते. खरेदी झाल्यानंतर शर्मा यांची पत्नी कारच्या डिकीत सामान ठेवत असताना, शर्मा कार पासून काही अंतरावर उभे होते.

यावेळी दोघा लुटारुंनी बीएमसीचे अधिकारी असल्याचे सांगुन शर्मा त्यांच्याकडे मास्कबाबत विचारणा केली.

शर्मा यांनी देखील त्यांनी मास्क का घातले नाही, असा प्रतिप्रश्न केल्यानंतर त्यांनी साहेबांकडे नेण्याचा बहाणा करुन त्यांना विश्राळी नाका येथील रुशिदा अपार्टमेंटसमोर नेले. त्यानंतर सदर लुटारुंनी लुटालुटीच्या घटना वाढत असल्याचे सांगुन त्यांना पाकीट, घडयाळ व सोन्याची चैन काढुन देण्यास सांगितले.

मात्र शर्मा यांनी नकार दिल्यानंतर दोघा लुटारुंनी त्यांना पकडून ठेवले, तर तिसऱया लुटारुने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन काढली. त्यानंतर तिघा लुटारुंनी रिक्षामधुन पळ काढला. त्यामुळे शर्मा यांनी आपल्या कारने सदर लुटारुंचा पाठलाग केला. मात्र सदर लुटारु त्यांच्या हाती लागले नाहीत. त्यामुळे त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

# आदई सर्कल रोजच होतो जाम ; अनधिकृत वाहन पार्किंगचा सर्वसामान्यांना फटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल-आदई सर्कल येथे रस्त्यांवर अनधिकृत पार्किंग होत असल्याने येथे नेहमीच वाहतूक कोंडी पहावयास मिळते. वाहतूक पोलिस नसल्याने व अनधिकृत पार्किंगवर कारवाई होत नसल्याने त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे.

नवीन पनवेल शहरातील आदई सर्कल जवळील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर बेकायदा बसेस उभ्या असतात. रस्त्यावर बसेसची उभी लांब रांग लागते. या बस चालकांकडून स्वतःला समाजसेवक म्हणऊन घेणारे हे बेकायदेशीर पैसे देखील उकळत आहेत. पार्किंगसाठी रस्त्यावर पैसे आकारले जात आहेत. मात्र वाहतूक विभागाने धृतराष्ट्राची भूमिका घेतलेली दिसून येत आहे. संध्याकाळी आणि



दुपारच्या सुमारास येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झालेली दिसून येते. त्यामुळे आपले वाहन या कोंडीतून कसे बाहेर काढायचे असा यक्षप्रश्न वाहन चालकांना पडल्याशिवाय राहत नाही.

आदई सर्कल जवळील वाहतूक कोंडीतून वाहन काढताना कित्येकदा वाहने एकमेकांना घासली जातात. त्यातून वाद उद्भवतात. कंट्रोलला फोन केल्यानंतर काही वेळाने याठिकाणी पोलिस येतात. मात्र नित्याची वाहतूक कोंडी होत असताना देखील वाहतूक पोलिस या ठिकाणी अनेकदा फिरकत नाहीत.

काही वेळेला सुकापूर ब्रिजखाली वाहतूक पोलीस दुचाकी चालकांना अडवतात. व त्यांना हेल्मेट, कागदपत्रे नसल्याने दंड आकारतात. मात्र आदई सर्कलजवळील रस्त्यांवर अनधिकृत पार्किंग होऊन वाहतूक कोंडी होत असताना देखील बसेस व इतर वाहनांवर कारवाई होत नसल्याने वाहतूक पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

आदई सर्कल जवळ मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे करण्यात आलेली आहेत. मात्र ही अतिक्रमणे काढण्यात पालिकेच्या अधिकाऱ्यांची हिम्मत होत नाही. त्यामुळे अतिक्रमण करणाऱ्यांचे फावले आहे. मटन, चिकन, भाजीवाले यांनी येथे आपले बस्तान बसवले. मटण, चिकन घेताना वाहन चालक रस्त्यावर गाडी लावतात त्यामुळे देखील वाहतूक कोंडीला हातभार लागतो.

### पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी केले...

# रेस्क्यू टीमसह पोलिस अधिकारी, कर्मचारी व पोलिस पाटलांचा विशेष सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील चंदेरी किल्ल्यावर गेलेल्या एका गिर्यारोहकाचा जीव रेस्क्यू टीमसह पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी तसेच त्या भागातील पोलिस पाटीलांनी तात्काळ मदत करून वाचवल्याबद्दल परीमंडळ २ चे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार केला.



काही दिवसापूर्वी चंदेरी किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी आपल्या सहकाऱ्यांसह गेलेल्या विराज संजय मस्के (वय २०) राहणार भांडुप याचा तोल जाऊन तो ६० फुट खोल दरीत कोसळला होता. याची माहिती पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांनी तातडीने पोलिस उपनिरीक्षक उमेश गुटाळ, पोलिस हवालदार ओंबासे, बदलापूर रेस्क्यू टीमचे नागेश साखरे व त्यांचे इतर सहकारी, निसर्ग मित्र संस्थेचे सदस्य, रिटघरचे पोलिस पाटील दीपक पाटील, स्थानिक ग्रामस्थ यांनी अथक मेहनत घेऊन विराज मस्के याला बाहेर काढले व तातडीने पुढील उपचारासाठी त्याला बदलापूर येथे रवाना केले.

या सर्व परिश्रमाचे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी कौतुक करून एका छोट्याखानी कार्यक्रमात सहाय्यक पोलिस आयुक्त भागवत सोनवणे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र दौंडकर व इतर अधिकारी वर्ग यांच्या उपस्थितीत या सर्वांचा सत्कार केला.

### माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांची....

# उरण शहरातील मच्छी मार्केट व भाजी मार्केट इमारतीच्या बांधकामासाठी तीन कोटी निधीची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून उरण शहरातील मच्छी मार्केट व भाजी मार्केट इमारतीच्या बांधकामासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत एक कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर निधी मंजूर केल्याचा शासन निर्णय क्र.नपावै-२०२१/प्र.क्र.२०१(३)/नवि-१६ ०३ नोव्हेंबर २०२१ रोजी नगरविकास विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

उरण शहरातील सदर मच्छीमार्केट व भाजीमार्केट इमारतीच्या बांधकामासाठी हा एक कोटींचा निधी कमी पडत असल्याने आज बुधवार दिनाकं ११ मे



२०२२ रोजी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे आणखीन तीन कोटी निधीची मागणी केली आहे, तसेच सदर कामाचे लवकरच भूमिपूजन मंत्री महोदयांच्या हस्ते होणार आहे. शिवसेनेच्या माध्यमातून हा निधी मिळाल्याने नागरिकांना उत्तम सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.